गोंड राजे कालीन माहूर

प्रा.डॉ. दत्ता यु. जाधव
इतिहास विभाग प्रमुख
श्री रेणुकादेवी महाविद्यालय, माहुर, जी. नांदेड.

देवगिरीच्या यादवाची आणि वैरागडाची नागवंशीय माना राजाची सत्ता संपुष्टात आली होती. कोलभिल्ल यानी विखूरलेल्या गोंडाना राजकीय दृष्टया संघटित केले होते. नागापासून माणिकगड किल्ला जिंकला होता. यादवापासून माहूरगड किल्ला जिंकला होता. बाराव्या शतकात विदर्भाच्या भुप्रदेशावर गोंड राजसत्ताचा उदय झाला होता. मध्यभारतात विदर्भाच्या भुप्रदेशावर गोंड जमातीने दिर्घकाळापर्यंत राज्य केले होते. गोंड सत्ता बाराव्या शतकाच्या उत्तार्धात सुरु होऊन अठराव्या शतकाच्या मध्यापर्यंत अस्तित्वात होती. गोंड सत्तेच्या प्रदेशाला 'गोंडवाना' असे म्हटले जाते. गोंडवाना नाव मोगल काळात अस्तित्वात आले होते. गोंडवाना प्रदेशात गोंडाची चार राजसत्ता निर्माण झाली होती.

१. गढामंडळाची गोंड राजसत्ता.
२. खेरलाची गोंड राजसत्ता.
३. देवगड नागपूराची गोंड राजसत्ता.
४. चंद्रपुरची गोंड राजसत्ता.

माहूर व परीसरावर चंद्रपुरची गोंड राजसत्ता होती. राजगोंड जमातीतील भिका नावाचा पुरुष आध्र प्रदेशचा जिल्हा अदिलाबादचा मोवाडा गावचा आत्राम घराण्याचा होता. माहूर व किनवट भागात आत्राम वंशीय राजगोंड आहेत. राजगोंड या जमातीच्या राजाची राजसत्ता माहूरगडावर होती. आत्राम घराण्याची सत्ता जुनगाव, शिरपुर व माणिकगड भागात उदयास आली होती. कोलभिल्ल नावाचा पुरुष गोंड सत्तेचा स्थापक राजा होता यादवाची सत्ता संपुष्टात आल्यानंतर गोंड राजानी विदर्भाच्या उत्तर पुर्वेकडील प्रदेश आपल्या अंमलाखाली आणले होते. माहूरचा प्रदेश यादवा नंतर गोंड राजसत्तेच्या अंमलाखाली आला होता.

माहूर व शिरपूरचा गोंड राजा भीम बल्लाळसिंह

माहूर प्रांताची सीमा यादव काळात आंध्रप्रदेशचे आदिलाबाद पर्यंत होती. शिरपूरचा गोंड राजा भिका उर्फ भीम बल्लाळसिंह इ.स. १२४७ ते १२७२ यानी शिरपूरला गोंडाची सत्ता स्थापन केली होती. देवगिरीवर रामचंद्र देव यादवाची सत्ता होती. पुरुषोतमपुरी ताम्रपटात आलेल्या उल्लेखा प्रमाणे इ.स. १२९० पर्यंत वैरागडचा प्रदेशावर यादव राजा रामचंद्र देवाची सत्ता होती. माहूर प्रांतात राजा रामचंद्र देवाच्या काळात उपांगदेवाची सता होती. शिरपूरचा गोंड राजा भिका, उपांगदेव यादवाचा मांडलिक राजा असावा. इ.स. १२८९ च्या उनकेश्वराच्या शिलालेखाप्रमाणे माहूरवर उपांगदेव यादवाची सत्ता होती. त्याना माहूर प्रदेशावरील आपली सत्ता जास्त दिवस टिकविता आली नाही असे दिसते. त्याचा फायदा शिरपूर विभागातील गोंड राजा भिका यानी घेतले होते. कोल भिल्ल यानी गोंड जमातीना राजकीय दृष्टया एकत्र केले होते. त्याच्यात भिका उर्फ भीम बल्लाळसिंह प्रमुख होता. गोंड राजसत्तेचे विस्तार कण्यासाठी गोंड सरदाराना जमिनी वाटप करण्यात आली होती. त्याना सैन्य उभे करण्यास परवानगी दिली होती. यातूनच चार गोंड राज सत्ता उदयास आली होती. भिका उर्फ भीम बल्लाळसिंह किनवट, आदिलाबाद आणि माहूर भागात गोंड राजसत्ता स्थापन केली होती. आंध्र प्रदेशाच्या अदिलाबाद जिल्हातील शिरपूरला गोंड राज्याची

राजधानी होती. भिम बल्लाळसिंहानंतर त्याचा मुलगा खर्जा बल्लाळसिंह शिरपूरच्या गादीवर बसला होता. त्याच्या नंतर त्याचा मुलगा हरिसिंग शिरपूरच्या गादीवर बसला होता. हरीसिंगानी रानटी स्थितीत असलेल्या गोंड समाजाला शेती बागायत करण्यस प्रोत्साहन दिले होते.

अदिया बल्लाळसिंह व माहूर इ.स.१३२२ ते १३४७.

हरीसिंहाचा मुलगा अदिया बल्लाळसिंह शिरपूरच्या गादीवर बसला होता. अदिया बल्लाळसिंहाने गोंड राज्याचा विस्तार करावयास सुरुवात केली होती. या काळात यादव सत्ताचा पतन झालेला होता. या संधीचा फायदा घेऊन अदिया बल्लाळसिंहानी माहूर व पूसद पर्यंतचा भाग आपल्या ताब्यात आणला होता. त्याच्या राज्याची सिमा वर्धा पर्यंत विस्तारली होती. अदिया बल्लाळसिंहानी शिरपूरच्या उत्तरेस ६० किलोमीटर अंतरावर वर्धा नदीच्या पुर्वेकडील काठावर राजधानीचे नगर बसविले होते. या नगरास आपल्या नावावरुन बल्लाळपूर नाव दिले होते. अदिया बल्लाळसिंहानी गोंड राज्याची शिरपूरची राजधानी बल्लाळपूरला स्थालांतरीत केली होती. बल्लाळपूरला बल्लाळसिंहानी बल्लाळपूरचा किल्ला बांधला होता. सहा एकर जागेवर काळया दगडानी बांधला आहे. किल्यात भूयार मार्ग आहे. बल्लाळपूरचा किल्यातील भूयार मार्ग माहूरचा किल्यात निघत होता. अशी माहूर व बल्लाळपूर परीसरातील गोंड समाजाची समज आहे. दोन्ही किल्यात भूयार मार्गाचा अवशेष आहे. माहूर गोंड राजा बल्लाळसिंहाची राजसत्तेची उपराजधानी होती. माहूरचा किल्याच्या पूर्वेकडील तटाच्या बांधकामाला बल्लाळसिंहाच्या काळात सूरुवात झाली होती. त्याच्या मुलानी बांधकाम पूर्ण केले होते. माहूरवर दिल्लीचा सूलतान अल्लाउद्दीनचा सेनापती मलिक काफूरानी आक्रमण केले होते. माहूरचा किल्ला व परीसर मुस्लिम राजसत्तेचा परीचयाचा झालेला होता. बल्लाळसिंहाच्या काळात गुलबर्गात बहामनशाहीची स्थापना झाली होती. गोंड राजा बल्लाळसिंहाला बहामनशाहीची माहूरवर आक्रमणाची भिती वाटत होती. आपल्या सूरक्षितासाठी बल्लाळपूरला गोंड राज्याची राजधानी स्थापन केली होती. व त्याठिकाणी किल्ला बांधला होता.

गोंड राजा तलवारसिंहाच्या काळातील माहूरवर बहामनी सूलतानाचे आक्रमण इ.स.१३४७ ते १३७२

अदिया बल्लाळसिंहचा मुलगा तलवारसिंह बल्लाळपूरच्या गादीवर इ.स. १३४७ ला बसला होता. गोंड राजा तलवारसिंह वृतीने चंचल व व्यसनाधिन होता. त्याच्यापासून प्रजेला त्रास सोसावा लागला होता. प्रजानी व गोंड सरदारानी राजा तलवारसिंहाला गादीवरुन काढण्याचा कट रचला होता. असा उल्लेख मिळतो. तलवारसिंह बेसावध राहत होता. त्याच्या बेसावध पणाचा फायदा बहामनशहाने घेतलेला दिसतो. बहामनशहा अल्लाउद्दीन हसनशहा ३ ऑगष्ट १३४७ ला गुलबर्गाला स्वतंत्र बहामनशहीची स्थापना केली होती. इ.स.१३४७ ते १३५८ पर्यंत अल्लाउद्दीन हसनशहाने बिदर व दौलताबाद शहर आणि त्याचा आजुबाजूचा प्रदेश जिंकून घेतले होते.

माहूरवर अल्लाउद्दीन हसनशहाने इ.स. १३५० ला आक्रमण केले होते. गोंड राजा तलवारसिंह माहूरचा राजा होता. या आक्रमणच्या वेळी तो बल्लाळपूरच्या किल्यात होता. माहूरचा आणि बल्लाळपूरचा अंतर नव्वद किलीमिटराचा आहे. त्यामुळे तो सैन्य घेऊन माहुरला येवू सकला नाही. असे दिसते. त्यांनी बहामनशहा बरोबर तह केला होता. गोंड राजा तलवारसिंहानी खंडणीच्या रुपाने अगणित संपत्ती बहामनशहाला दिली होती. बहामनशहाच्या अक्रमना पासून माहूर प्रांताचा बचाव केला होता. माहूर व परीसरातील जनतेवर कर लावून बहामनशहाला खंडणी दिली जात होती. माहूरची नियमीत खंडणी वसूल

करण्याची जबाबदारी बहामनशहानी सफदार खान सिस्तानीला दिली होती. गाविलगड जिंकल्यावर गाविल प्रांताचा बहामनशहानी पर्शियन सफदारखान सिस्तानीला 'मजलिस-ए-अली' उर्फ गव्हर्नर या पदावर इ.स. १३५२ ला नेमले होते.

गोंड राजा तलवारसिंहाच्या निधनानंतर त्याचा पुत्र केसरसिंहाकडे इ.स. १३७२ ते १३९७ या काळात गोंड राजसत्तेचा कारभार आला होता. तो इ.स. १३७२ ला बल्लाळपूरच्या गादीवर बसला होता. गोंड राजा केसरसिंहाच्या काळात माहूरच्या व बल्लाळपूरच्या किल्यात बैल व घोडे याच्या भरपूर संग्रह होता. असे उल्लेख आढळते. केसरसिंहानी त्याच्या काळात गोंड राज्यात शांतता व सुव्यवस्था स्थापित करण्याचा पर्यंत केला होता. बहामनशहानी माहूर प्रांतावर लादलेली खंडणी यानी दिलेली होती. अंतर्गत बंडाळी मिटवून घेतले होते. राज्यातील आर्थिक व्यवस्थेत सूधारणा करण्यात आली होती. केसरसिंहाच्या काळात गोंड राजसत्तेचा विस्तार झालेला दिसतो.

गोंड राजा दिनकरसिंह व माहूर इ.स.१३९७ ते १४२२.

गोंड राजा दिनकरसिंह इ.स. १३९७ ला बल्लाळपूरच्या गादीवर बसला होता. राजा दिनकरसिंह माहूरच्या किल्ल्यात राहत होता. यानी माहूरच्या किल्ल्यात राजवाडा बांधला होता. असा उलेख येतो. दिनकरसिंहानी माहूर किल्याचे बल्लाळसिहानी सूरु केलेले पूर्वेकडील तटाचे बांधकाम पूर्ण केल्याचे दिसते. यानी ज्या तटाचे बांधकाम केले होते. त्या तटाला वर्तमान काळात डूकरबूरूज म्हणुन ओळखले जाते. किल्यातील अनेक ऐतिहासिक वास्तुचे बांधकाम दिनकरसिंहानी केलेले होते.

गोंड राजा दिनकरसिंहाच्या काळात राज्यात सुव्यवस्था व शांतात निर्माण झाली होती. राज्यातील अर्थव्यस्था सूधारली होती. राज्यातील उत्पन्न वाढले होते. खजिना कर वसूलीने भरलेला होता. बिदरचा बहामनी सूलतानाच्या प्रदेशाच्या सिमेपर्यंत माहूरच्या राज्याची सिमा पोहचलेली होती. यामुळे गोंड राजा दिनकरसिंहात व बिदरचा बहामनी सूलतान यात संघर्ष सुरु झाले होते.

गोंड राजा दिनकरसिंहा जवळ परिस होते. अशी अख्यायिका माहूर परीसरातील जनमानसात आहे. गोंड राजा दिनकरसिंहा जवळ 'जाटाबा' नावाचा प्रसिध्द हत्ती होता. हत्तीच्या पायात लोंखड बांधून त्याला इंजाळा तलावात उतरवीत होते. इंजाळा तलाव किल्याच्या मध्यभागात आहे. जुन्या पध्दतीने दगडाने बांधून काढलेला आहे. तलावात परिस ठेवले होते. दिनकरसिंहाला आर्थिक अडचण आल्यावर तो हत्तीच्या पायात लोखंड बांधून त्याचे सोने करुन घेत होता. इंग्रज संशोधकानी माहूरच्या तलावातील परिस शोधण्याचा प्रयत्न केला होता. असा उल्लेख आढळतो. विवेचनातून असे निर्देशनात येते, गोंड राजा दिनकरसिंहाच्या काळात सोन्याचे धातूचे मुल्य कमी होते. दिनकरसिंहाने सोन्याची नाणी पाडली होती. राज्याच्या विकासासाठी नाण्याचा उपयोग करीत होता. म्हणुन गोंड राजा दिनकरसिंहाच्या जवळ परिस असावे, असे लोकांना वाटत होते. गोंड राजा दिनकरसिंह धार्मिक वृतीचा राजा होता. यांच्या कारकिर्दीत गोंड राज्यात मराठी भाषिकाची वस्ती वाढलेली होती. राजा दिनकरसिंहाच्या काळात कर्तृत्वान पुरुष, कवी, भट्ट, व विद्वान लोकानी माहूर नगरात वसाहत केली होती. यांच्या कडून तत्वज्ञान व धार्मीक कार्य करवून घेतले होते.

माहूर नगरातील विष्णुपूरी मठ असलेल्या ठिकाणी गोंड राजा दिनकरसिंहाच्या काळात शांतता व सूपीकता नांदत असल्यामूळे माहूर नगरात लोंकाची वसाहत वाढलेली होती. माहूर नगराची दिनकरसिंहाच्या काळात आठ हजार लोकवस्ती होती. माहूर नगराची ओसाड वस्तीत खोदकाम केल्यावर जमीनीत लोक वस्तीचे अवशेष मिळतात. पूरातत्वीय पध्दतीने उत्खन्नण केल्यास जास्त प्रमाणात अवशेष मिळू शकतात.

गोंड राजा रामसिंह कालिन माहूर इ.स.१४२२ ते १४२८

गोंडराजा रामसिंह इ.स. १४२२ ला गोंड राजसत्तेच्या बल्लाळपूरच्या गादीवर बसला होता. माहूरवर सतत बहामनशाहीचे सूलतान आक्रमण करीत होते. गोंडराजा रामसिंहानी सूलतानाच्या आक्रमणाला सामना करण्यासाठी नविन सैन्याची भरती केली होती. त्यानी सैनिकाना नगदी वेतन देण्याची पध्दत बंद केली होती. त्याना जमीनी वाटप करुन देण्यात आली होती. त्यातुन त्याच्या खर्च करावा. अशी व्यवस्था केल्याचा उल्लेख आढळते.

माहूर परिसरातील गोंड समाजात एक गोष्ट सांगितली जाते. गोंड राजा रामसिंहाच्या सैनिकानी 'ताडवा' वनस्पतीचे भक्षण केले होते. सैनिकाचे शरीर वज्रदेही बनले होते. गोंडराजा रामसिंहाच्या सैनिकाना 'ताडवेल' सैनिक असे म्हणत होते. माहूर परिसरात ताडवेल वनस्पती विषयी एक आख्यायीका आहे. किनवट तालूक्यातील इस्लापूर गावाजवळ पैनगंगा नदीवर एक धबधबा आहे. तो धबधबा सहस्त्रकूंड म्हणून ओळखला जातो. धबधबाच्या ज्या ठिकाणी पाण्याची धार पडते त्या ठिकाणी 'ताडवा' वनपस्तीची वेलाच्या स्वरुपात वाढ होत होती. त्याला भक्षण करायचा असेल तर नरबली द्यावा लागत होता. त्या ठिकाणी कोणी जात नव्हते. ताडवा वनस्पती नरभक्षक होती. या ठिकाणी फक्त ज्याला या वनस्पतीची गरज आहे ते जात होते. ही वनस्पती भक्षण केल्यांनतर तो व्यक्ति अमर होतो. तो कधीही मरत नाही. व त्यावर कोणत्याही शस्त्राचा परिणाम होत नाही. ताडवा वनस्पतीस भक्षण करण्यासाठी त्याला सुरुवातीला नरबळी दिल्यानंतर ती वेल त्या धबधब्यावरुन किणाऱ्याकडे वळत होती. ताडवा वनस्पती पुन्हा त्या नरबळी दिलेल्या नराला देऊन त्याला पुन्हा जिवंत करीत होते. आणि ती वनस्पती आपल्या जवळ बाळगत होते.

गोंडराजा रामसिंहानी आपल्या सैनिकाना ताडवा वनस्पती भक्षण करण्यास दिलेले होते. सैनिकाना वज्रदेही बनविले होते. त्यांच्यावर कोणत्याही शस्त्र-अस्त्राच्या माराचा परिणाम होत नव्हता. ताडवा वनस्पती भक्षण केलेल्या सैनिकाला ताडवेल असे म्हटले जात होते. सदरील विवेचनातून असे निर्देशनास येते की, रामसिंहाजवळ असलेले सैनिक बलवान व धृष्टपुष्ट होते. बहामनी सूलतान फिरोजशहानी इ.स.१४०५ ला हिजरी सन इ.स. ८१५ ला माहूरगडावर स्वारी केली होती. सूलतान फिरोजशहानी विजयनगरचा राजा देवराय प्रथम याच्यावर आक्रमण करण्यासाठी दक्षिणेकडे जात होते. माहूर नगर मार्गे विजयनगराला जात असताना माहूरच्या गोंड राजा दिनकरसिंहाशी सघर्ष होणार होता. सूलतान फिरोजशहानी युध्द न करता गोंड राजा दिनकरसिंहा सोबत तह करुन खंडणी घेऊन परत आपली राजधानी गूलबर्गाला गेला होता. फिरोजशहा आणि गोंड राजा दिनकरसिंह याच्यात तह झाले होते. फिरोजशहा गादीवर असे पर्यंत माहूरवर स्वारी केलेली दिसत नाही.

बहामनी सूलतान अहमदशहाची माहूरवर स्वारी.

बहामनी सूलतान अहमदशहा गुलबर्गाच्या इ.स. १४२२ ला गादीवर बसला होता. अहमदशहानी गुलबर्गाची राजधानी स्थालांतर करुन बिदरला आणली होती. सूलतान अहमदशहा गादीवर बसल्यानंतर बहामनशाहीचा राज्यविस्तार करण्यास सुरुवात केली होती. माहूर प्रांत बहामनशाहीच्या पुर्वे कडील प्रदेशाच्या सिमेस लागून होते. प्रांत सूपीक होता. फिरोजशहाच्या काळातील थकित खंडणी गोंड राजा कडून वसूल करण्यासाठी अहमदशहानी माहूर प्रांतावर आक्रमण केले होते. यावेळी माहूरवर गोंड राजा रामसिंहाची सत्ता होती.

संदर्भ सुची

१. कालिकाखंड अमलिग्राम महात्म्य अध्याय विसावा
२. कोयते वि. बी.- लिळाचरित्र - महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक मंडळ मुबंई १९८४
३. डॉ. कटारे व डॉ. नगराळे - मराठवाडयाचा इतिहास - कल्पना प्रकाशन १९९९
४. डॉ. प्रल्हास नरहर जोशी - माहुरगडची वासीनी रेणुका- कॉन्टीनेटल प्रकाशन पुणे,
५. प्रा. राम शेवाळकर - यशोधन- महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतीक मंडळ, मुंबई
६. अ. ज. राजुरकर - चंद्रपुरचा इतिहास - हरीवंश प्रकाशन चंद्रपुर
७. Abul fazl, The Akabarnama Transalated by Beverdge H.Vol III Delhi Atlantic Publishers and Distributors Reprinted १९८९
८. डॉ. चंद्रशेखर गुप्त - प्राचीन विदर्भाचा ऐतिहासिक भुगोल -विश्वभारतीय प्रकाशन
९. प्रा. एस. एस. लोकडे - भुलजा येथील अवशेष- भारतीय इतिहास आणि सांस्कृत
१०. नांदेड डिस्टीक गॅझेटर मिडियल प्रेड
११. कुंट्टे - बहामनी राज्याचा इतिहास
१२. यवतमाळ डिस्टीक गॅझेटर
१३. अकोला डिस्टी गॅझीयटर (मध्ययुगीन काळ)
१४. सेतु माधवराव पगडी - समग्र सेतु माधवराव पगडी - डॉ. विद्यादेवधर कार्यावाह, मराठी साहित्य परिषद, आंध्र प्रदेश, हैद्राबाद
१५. य. खु. देशपांडे - शारदाश्रम वार्षिक- विदर्भ प्रिंटीग प्रेस अमरावती, शके १८५५, पुष्ठ क्रं ९१.
१६. डॉ. देव प्रभाकर- महाराष्ट्राचे प्राचीन कलावैभव, काळे भगवान संपादिदत, संयुक्त महाराष्ट्र काल आणि आज, जालना संकेत प्रकाशन, १९८६
१७. मिराशी वा.वी. सातवाहन आणि पश्चिमी क्षत्रप याचा इतिहास आणि कोरिव लेख , मुंबई १९७९
१८. खरे ग.ह.(संपा) दक्षिण च्या मध्ययुगीन इतिहासाची साधने खंड-२ पुणे, भा.इ.स.मं.प.